# Executive Summary

**Name:- Prof. G.B.Ghayal**

**Title Of Project: Critical Analysis of Library Software in Technical Institution in Amravati Division.**

**File No. :- 23-397/12 (WRO)**

Scanned by CamScanner

# १. संशोधन प्रकल्पाचा सांराश

आजच्या संगणकाच्या युगात प्रत्येक क्षेतामध्ये संगणकाने प्रवेश केला आहे दैनंदीन कामकाजापासून व्यवसायीक कामकाजापर्यंत संगणकाशिवाय काम ही गोष्ट पूर्णत्वास जावू शकत नाही संगणकामूळे मानवी जिवनात अविश्वसनीय असा बदल झाला आहे मानवाच्या प्रगतीसाठी संगणक अतिशय महत्वाचे ठरले आहे शिक्षण क्षेत,संरक्षण क्षेत,व्यापारी क्षेत,संशोधन अभियांतीकि वैदयकिय अंतराळ संशोधन या सारख्या अनेक क्षेतामध्ये संगणकाने आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे.शाळा,महाविदालयात संगणकाचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.विदयार्थी,वाचक,संशोधक यांना संगणक अतिशय उपयुक्त आहे.इंटरनेट,सायबर स्पेस,मल्टीमेडीया,अॅन्डाइड इत्यादी तंतज्ञानामूळे विकासाला मोठया प्रमाणात चालना मिळाली.घरबसल्या इ बँकिंग, इ एज्युकेशन, इ व्यापार,इ रेल्वे बुकींग,खरेदी विक्री इत्यादी व्यवहार संगणकाच्या सहायााने सहज पार पाडले जात आहेत.

जगातील प्रगत राष्ट संगणकाचा माहीती तंतज्ञानासाठी मोठया प्रमाणात वापर करतांना दिसून येत आहे. म्हणुन नविन माहीती विकासाची गुरूकिल्ली आहे असे म्ळटले जाते. नविन माहीती तंतज्ञानामुळे प्रत्येक क्षेतामध्ये क्रांतीकारी बदल झाला आहे.भारताने १९९९ हे वर्ष तंतज्ञान वर्ष म्हणुन जाहीर केले.आज सॉफ्टवेअर टेकनॅलॉजीमध्ये जगात भारताने आपला ठसा उमटविला आहे.भारत सरकारच्या वतीने संगणक वापरासंबधी मोठया प्रमाणात चालना दिली जात आहे.

आज संगणकाचा उपयोग सर्वच क्षेतामध्ये मोठया प्रमाणात केला जात आहे. त्या ग्रंथालय सुध्दा अपवाद राहीले नाही. भारतातील अनेक ग्रंथालयांनी आपल्या ग्रंथालयामध्ये संगणकिकरण केले आहे. नॅक कमिटी बंगालोर यांनी महाविदयालयीन ग्रंथालयांनी संगणीकिरण करण्यास सुचीत केले आहे. यासाठी

Scanned by CamScanner

यु.जी.सी. नवी दिल्ली यांनी महाविदयालयीन ग्रंथालयात संगणीकिरण करण्यास विषेस अनुदान उपलब्ध करून दिले आहे. आज मोठया प्रमाणात खाजगी व शासकिय सॉफटवेअर उपलब्ध आहे.याचाच परिणाम म्हणुन ग्रंथालय संगणकिरण करण्यास शैक्षणिक संस्था, ग्रंथपाल उत्सुक आहेत.

महाराष्ट्राच्या प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्टातील अमरावती विभागाची निवड करण्यात आली आहे.अमरावती विभागामध्ये अकोला,अमरावती,वाशीम,बुलडाणा,यवतमाळ हे पाच जिल्हे असुन या जिल्हयामध्ये अकरा अभियातीकी महाविदयालय आहेत.या महाविदयालयापैकी प्रत्येक जिल्हयातील एक अभियातीकी महाविदयालयातील ग्रंथालयाची निवड संशोधनासाठी करण्यात आली आहे. या संशोधनासाठी संहेतूक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.अमरावती विभाग हा मागासलेला म्हणुन ओळखला जातो.या विभागातील तंत्रशिक्षण संस्थेच्या ग्रंथालयातील सॉफटवेअरचे अध्ययन करण्यात आले आहे.ग्रंथालयामध्ये अस्तितवात असलेल्या सेवा वाचकांना किती प्रमाणात उपलब्ध करून दिल्या जातात याचा शोध घेण्यात आला.प्रत्यक्षात उपलब्ध असलेल्या सेवेपैकी अनेक सेवा वाचकांना माहीती नसल्याचे जानवले. यासाठी माहीती साक्षरता हा कार्यक्रम राबवून वाचकांना माहीती साक्षरतेबददल जागत करणे गरजेचे आहे.

Scanned by CamScanner